"A"
Re-accredited by NAAC
(2014)
With CGPA-3.16

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
PHONE : EPABX-2609000 PGBUTR - 2609139
FAX +91-0231-2691533 & 2692333 website: www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
दुरध्वनी : (ईपीएबीएक्स) 2609000 पी.जी.बी.यु.टी.आर. 2609139
फॅक्स : +91-0231-2691533 व 2692333. e-mail : directorbcud@unishivaji.ac.in
pgbutr@unishivaji.ac.in

---

संदर्भ क. शिवाजी वि./पीजीबीयुटीआर/प्रवेश प्रक्रिया15-16/ 130 दि. 23 OCT 2015

प्रति,
मा. प्राचार्य /संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये
/मान्यताप्राप्तसंस्था/स्वायत्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :- शैक्षणिक वर्ष 2015-16 च्या एम.फिल., पीएच.डी. प्रवेश क्षमतेबाबत.**

**संदर्भ** :- 1) UGC (Minimum Standards and Procedure For Awards of M.Phil./Ph.D. Degree) Regulation, 2009.
2) शिवाजी वि./बीयुटीआर/युजीसी/एसी/98 नुसार दि.2/9/2015 रोजीचे पत्र.
3) युजीसी, नवी दिल्ली यांचे दि. 6th July 2015 रोजीचे पत्र क.D.O. No.F.10-6/2011(PS) Misc
4) युजीसी, नवी दिल्ली यांचे दि. 4th Sept. 2015 रोजीचे पत्र क.D.O. No.F.10-6/2011(PS) Misc

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2015-2016 साठी दि. 12 मार्च ते 8 एप्रिल 2015 या कालावधीमध्ये एम.फिल., पीएच.डी. च्या मान्यताप्राप्त मार्गदर्शकांनी प्रवेश क्षमता कळविलेली आहे. दि. 3 व 4 ऑक्टोबर 2015 रोजी एम. फिल. व पीएच.डी. प्रवेश परिक्षा झाली आहे. पात्र झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती 20 ते 30 ऑक्टोबर 2015 या दरम्यान होणार आहेत.

दि. 6 जुलै 2015 आणि दि. 4 सप्टेंबर 2015 रोजीचे यु.जी.सी., नवी दिल्ली यांचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाले आहे. युजीसीचे 2009 चे राजपत्रास (Minimum Standards and Procedure For Awards of M.Phil. / Ph.D. Degree) अनुसरून उपरोक्त संदर्भ क. 3 चे पत्रामध्ये Universities shall allocate the supervisor from amongst the regular faculty members in a department or its affiliated PG Colleges/Institutes depending on the number of students per faculty member, the available specialization among the faculty supervisors and the research interest of the student. तसेच Any violation of the Regulation of the UGC will be viewed very seriously by the UGC. असे नमुद केले आहे.

उपरोक्त संदर्भ क. 4 च्या पत्रामध्ये In case of any aberration by the University, it will be proceeded against as per the UGC Act, 1956 and the name of the University will be put in the defaulters list on the UGC website. असे नमुद केले आहे.

दि. 23/7/2015 रोजीच्या विद्यापरिषदेमध्ये युजीसी च्या दि.6/7/2015 रोजीच्या पत्राबाबत झालेल्या ठरावानुसार याबाबतची अमंलबजावणी 2015-16 पासून करावयाची आहे आणि याप्रमाणे आपल्या महाविद्यालयास उपरोक्त संदर्भ क. 2 चे पत्र पाठविणेत आलेले आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाकडून दि. 2/9/2015 रोजी युजीसीला उपरोक्त संदर्भ क. 3 च्या पत्राबाबत अधिकचे मार्गदर्शन होणेबाबत पत्र पाठविणेत आलेले आहे.

**तेंव्हा सदर दोन्ही पत्रामध्ये नमुद केलेनुसार शिवाजी विद्यापीठामधील अधिविभागातील मार्गदर्शकांना आणि शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त पदव्युत्तर महाविद्यालयांतील/संस्थेमधील पदव्युत्तर शिक्षक नियुक्ती असणाऱ्या मार्गदर्शकांनाच संशोधक विद्यार्थी देता येणार आहेत.** शिवाजी विद्यापीठाचा लौकिक आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन तसेच विद्यापरीषदेच्या ठरावानुसार कार्यवाही करताना शैक्षणिक वर्ष 2015-16 ची जाहिर केलेली प्रवेश क्षमता मोठया प्रमाणात कमी होऊ शकते. तरी याची सर्व मार्गदर्शकांनी नोद घ्यावी.

सदरचे परिपत्रक हे आपल्या महाविद्यालयामधील/संस्थेमधील सर्व शिक्षकांच्या/मार्गदर्शकांच्या निर्दशनास आणावे.

आपला विश्वासु,

संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ.

प्रत माहितीसाठी :-
मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.